रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,रामानंदनगर(बुर्ली)

ता. पलूस, जि. सांगली

## "आजादी का अमृत महोत्सव उपक्रम"

दिनांक: १९/०३/२०२१

## कार्यक्रम अहवाल

भारताच्या स्वातंत्र्याची 75 वर्ष पुर्ती निमित्त 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम दि.१९/०३/२०२१रोजी सकाळी 9:30 वाजता एन.एस.एस आणि इतिहास विभाग यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, तासगाव जि. सांगली येथिल प्रा. हेमंत लक्ष्मणराव कांबळे सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात भारतातील प्राचीन , ब्रिटिश आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शासन व्यवस्था, समाज व्यवस्था, देशासाठी बलिदान देणारे स्वातंत्र्यवीरांचे योगदान, त्यांनी केलेला त्याग, जनतेने सोसलेल्या हालअपेष्ठा, केलेला संघर्ष, स्वातंत्र्याचे महत्व, आणि युवकांची भूमिका इत्यादी मुद्दे मांडले. विद्यार्थी आणि त्यांची देशाच्याप्रती भावीनागरिक म्हणून असणारी जबाबदारी याचा उल्लेख केला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे मा.प्राचार्य, डॉ. कदम एल. डी.यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्वातंत्र्याची किंमत काय आहे याची जाणिव विध्यार्थ्यांना करुन दिली. स्वातंत्र्योत्तर युवकांची जबाबदारी यावर आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख इतिहास विभाग प्रमुख डॉ. सोनावले आर. आर. यांनी करुन दिली कार्यक्रमाचे आभार हिन्दी विभाग प्रमुख डॉ.भोसले के.बी.यांनी मानले. तर कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ. खाडे ए. एस.यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन आणि नियोजन एन.एस.एस.आणि इतिहास विभागामार्फत केले.

**निष्पत्ती -** विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य संग्रामाची ओळख झाली.
विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्योत्तर जबाबदारीची जाणिव निर्माण झाली.

**लाभार्थी संख्या :** ४५





**प्रमुख पाहुणे.** प्रा. कांबळे एच. एल. आपले विचार व्यक्त करताना

**अध्यक्ष, मा.प्राचार्य डॉ.कदम एल. डी.मनोगत व्यक्त करताना**

प्रमुख
इतिहास विभाग

प्राचार्य,
डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,रामानंदनगर(बुर्ली)

Scanned by CamScanner